तरुण भारत संवाद
गुरूवार, २० नोव्हेंबर २०२५

# विवेकानंदचा अनिकेत उंच उडीत द्वितीय

- शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाचा एम.ए. भाग १ मध्ये शिकत असलेला विद्यार्थी अनिकेत माने याने उंच उडी खेळ प्रकारात झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धेमध्ये दोन सिल्वर मेडल मिळवले. पुढे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी तो पात्र ठरला.

त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.पी.थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर,महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस.के धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

hThorat
20-11-2025